**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**
**बुधवार, दिनांक : १२ जून, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **भाजपचे ज्येष्ठ नेते नितिन गडकरी यांनी स्वीकारला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीपदाचा कार्यभार.**
2. **जागतिक लिंग गुणोत्तर निर्देशांकात भारताची १२९ व्या स्थानावर घसरण.**
3. **आषाढी यात्रेनिमित्त राज्य परिवहन मंडळ सोडणार ५ हजार विशेष बस गाड्या .**
4. **नैऋत्य मान्सून पावसाची राज्यात घोडदौड कायम- पश्चिम विदर्भातील बहुतांश भागात पावसाची नोंद.**

#####

**गडकरी पदभार**

भाजपचे ज्येष्ठ नेते नितिन गडकरी यांनी आज रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांनी ही जबाबदारी पुन्हा सोपवल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री अजय टमटा आणि हर्ष मल्होत्रा यांनीही आज मंत्रालयाची सूत्रं हातात घेतली. दरम्यान केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रीपदाचा पदभार निर्मला सीतारामन यांनी स्वीकारला.

**लोकसभा अधिवेशन**

नवनिर्वाचित लोकसभेचं पहिलं अधिवेशन २४ जूनपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, लोकसभेच्या सभापतींची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण आणि त्यावर चर्चा होईल. राज्यसभेचं २६४वं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होईल आणि संसदेचं हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल. संसद हे १४० कोटी भारतीयांच्या- इच्छा आणि आकांक्षांवर चर्चा, विचार-विनिमय करण्याचं आणि त्या पूर्ण करण्यासाठी काम करण्याचं उत्तम व्यासपीठ आहे, असं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**विधानसभा पावसाळी अधिवेशन**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी आज जारी केली. त्यानुसार विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचं अधिवेशन येत्या २७ जून रोजी सुरु होणार आहे.

**विधान परिषद**

विधान परिषदेच्या नाशिक शिक्षक मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे महाविकास आघाडीचे उमेदवार असतील असं आज जाहीर करण्यात आलं. मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने अनिल परब यांना उमेदवारी दिल्याचं पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत जाहीर केलं. कोकण पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे संजय मोरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून ही जागा काँग्रेस लढवणार आहे.

**चंद्राबाबू नायडू शपथ**

तेलुगु देसम पार्टीचे अध्यक्ष नारा चंद्राबाबू नायडू यांनी आज आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपाल एस अब्दुल नझीर यांनी नायडूंसह २४ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. जनसेना पार्टीचे अध्यक्ष के. पवन कल्याण यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तर

भाजपचे ज्येष्ठ नेते मोहन चरण माझी आज ओदिशाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. भुवनेश्वरच्या जनता मैदानावर आज संध्याकाळी त्यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. त्यांच्यासोबत कनकवर्धन सिंह देव आणि प्रवती परिदा हे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत.

**अब्दुल सत्तार**

शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी पणन विषयक सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या. राज्य कृषी उत्पादन मंडळाच्या १५२ व्या संचालक मंडळाची सभा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज्य कृषी पणन मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला. महाराष्ट्र राज्य पणन मंडळातर्फे बापगाव, काळडोंगरी, छत्रपती संभाजीनगर तळेगाव दाभाडे तसेच सिल्लोड श्रीरामपूर येथे उभारण्यात येणाऱ्या नियोजित प्रकल्पांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. याशिवाय काजू बोर्ड, आंबा बोर्ड, शासन अनुदानित

नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर येथे उभारण्यात येणा-या संत्रा प्रकल्पांचे कामकाज याचा आढावा घेण्यात आला. स्मार्ट प्रकल्पातून निर्माण करण्यात येणाऱ्या पणन विषयक सुविधा, ई-नाम योजनेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १५ बाजार समित्यांबाबत ई- नाम योजनेनुसार पुढे करावयाची कार्यवाहीबाबत सद्यस्थितीची माहिती मंत्री सत्तार यांनी यावेळी दिली.

**नीट**

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नीट परीक्षेच्या निकालानंतर वारंवार विचारले जाणारे प्रश्न जारी केले आहेत. या महिन्याच्या ४ तारखेला जाहीर झालेल्या नीट निकालातील कथित विसंगतींच्या पार्श्वभूमीवर FAQ जारी करण्यात आले आहेत.
वेळेच्या नुकसानासाठी उमेदवारांना भरपाईचे गुण देण्याच्या पार्श्वभूमीवर तक्रार निवारण समिती आधीच स्थापन करण्यात आली आहे. एनटीएने हे स्पष्ट केलं आहे की कथित एक हजार 563 उमेदवारांना कोणतेही नुकसान भरपाईचे गुण देण्यात आलेले नाहीत.

**जागतिक लिंग गुणोत्तर**

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या आज जाहीर झालेल्या अहवालात जागतिक लिंग गुणोत्तर निर्देशांकात भारताची १२९ व्या स्थानावर घसरण झाली आहे. दक्षिण आशियामध्ये भारत पाचव्या स्थानावर आहे. बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका आणि भूतान हे देश भारताच्या पुढे असून या क्रमवारीत पाकिस्तानचा क्रमांक शेवटचा आहे. जागतिक क्रमवारीत आइसलँडने आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. दरम्यान, जागतिक क्रमवारीत घसरण झाली असली तरी माध्यमिक शिक्षण आणि राजकारण परिसंस्थेतील सक्षमीकरणात भारताने लिंग गुणोत्तरात समतोल साधल्याचं या अहवालात म्हटलं आहे. मागील वर्षीपेक्षा यंदा लिंग गुणोत्तरात किंचित घाट झाल्याचंही अहवालात म्हटलं आहे.

**नाना पटोले**

महाराष्ट्रातून जीएसटीसह सर्व प्रकारच्या कर संकलनातून सर्वात जास्त निधी केंद्र सरकारकडे जमा होतो पण राज्याला निधी देताना मात्र हात आखडता घेतला जातो. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यांना निधी वितरण करण्यात आले. यामध्ये भाजपाशासित उत्तर प्रदेशला सर्वात जास्त २५ हजार कोटी रुपये, मध्य प्रदेशला १० हजार ९७० कोटी, तर सरकारला पाठिंबा देणाऱ्या नितीशकुमार यांच्या बिहारला १४ हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे पण महाराष्ट्राला केवळ ८ हजार कोटी रुपये देऊन तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे, असा आरोप कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. केंद्र सरकारद्वारा निधी वाटपासंदर्भात जारी

केलेल्या प्रसिद्धी पत्रकात भाजपचे सरकार सातत्याने महाराष्ट्राला सापत्नभावाची वागणूक देत असल्याचा आरोप नाना पाटोळे यांनी केला आहे.

**उद्धव ठाकरे/ काश्मीर हल्ला निषेध**

तीन दिवसांत काश्मीरमध्ये तीन दहशतवादी हल्ले झाले. केंद्र सरकार आता तरी याची जबाबदारी घेणार का, असा प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला लक्ष्य केले. सरकारला जबाबदाऱ्या पाळता येत नसतील तर नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याचा अधिकार नाही असेही त्यांनी सुनावले. यावेळी ठाकरे गटाचे मुंबई पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे उमेदवार अनिल परब यांच्या वचननाम्याचं प्रकाशनही उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आलं.

दरम्यान, जम्मू काश्मीर मध्ये दोन दिवसा आधी दहशतवाद्यांनी भाविकांच्या बस वर गोळीबार करून हल्ला केला यात १० भाविकांचा मृत्यू झाला.

**स्टँड अप इंडिया**

स्टँड अप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमीत्त केंद्र शासनाने अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउद्योजकांसाठी स्टँड अप इंडिया ही योजना आणली आहे. अनुसुचित जाती व नवबौध्द घटाकातील 18 वर्षावरील नवउद्योजक यांना 10 टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत 75 टक्के कर्ज मंजुर केल्यानंतर उर्वरित मुल्याच्या 15 टक्के अनुदानशासनामार्फत देण्यात येते.

यासाठी प्रकल्प कर्ज मंजुर पात्र इच्छुक नवउद्योजकांनी जिल्हयांतील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय इथं संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. त्याचप्रमाणे इंडिया योजनेअंतर्गत धनगर समाजातील महिलांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करुन देणेबाबतच्या योजनेला देखील मान्यता देण्यात आलेली आहे.

**विदर्भात पाऊस**

नैऋत्य मान्सून पावसाची राज्यात घोडदौड कायम असून पश्चिम विदर्भातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली आहे. बुलढाणा जिल्हयात काल रात्री वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. काही ठिकाणी नागरिकांच्या घरात पाणी शिरत असल्याच्या घटना घडल्या तर काही घरावरील टिनपत्रे उडून गेली. त्याचबरोबर

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाडाला बांधलेल्या झोपाळ्यातील ६वर्षे चिमुकलीचा झोपाळा हवेत उंच उडाल्याने तिचा जमिनीवर आपटून जागीच मृत्यू झाला. तर काल यवतमाळ जिल्ह्यात मॉन्सूनच्या पहिल्याच मुसळधार पावसामुळे दारव्हा तालुक्यातील बोरी अरब गावाजवळील पूल पाण्याखाली आला आहे. परिणामी यवतमाळ ते दारव्हा मार्गावरील वाहतूक तीन तासांसाठी ठप्प झाली होती. आज वर्धा, गडचिरोली आणि अमरावती इथं पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान मागील २४ तासांत सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं 42 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदविल गेल. तर नागपुरात काल 42 पुर्णाक 4 दशांश अंश सेल्सिअस इतकं तापमान राहीलं. येत्या ५ दिवसांत कमाल तापमानात कोणताही बदल होण्याची शक्यता नसल्याचं हवामान खात्यानं सांगितलं आहे.

**राष्ट्रवादी कांग्रेस**

या निवडणुकीत आमच्याकडून काही चूका किंवा त्रुटी राहिल्या होत्या त्यातून बोध घेऊन दुरुस्त केल्या जातील आणि आम्ही विधानसभेला सामोरे जाऊ, असा विश्वास राष्ट्रवादी कॉँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आज मुंबईतील पत्रकार परिषदेत व्यक्त केला. महायुतीमध्ये कोणतेच वाद नाहीत.

येणारी विधानसभा डोळ्यासमोर ठेवून आमच्यामध्ये कोणताही समज - गैरसमज निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल असही पाटील यांनी स्पष्ट केलं . अंतर्गत मतभेदाचे विषय समन्वय समितीसमोर मांडून त्याचे निराकरण केले जाईल. त्यामुळे 'आमचे लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे आहे, असं पाटील म्हणाले.

**कॉम्रेड स्पर्धा**

धावण्याच्या स्पर्धेतील अतिशय कठीण समजली जाणारी कॉमरेड मॅराथॉन स्पर्धा दक्षिण आफ्रिकेतील डर्बन इथ नऊ जुन रोजी पार पडली. या स्पर्धेसाठी देशभरातून हजारो स्पर्धकांसोबत अमरावती जिल्ह्यातील सहा धावपटूंनी सलग अकरा तास धावत ९० किलोमिटर इतकं अंतर पार केलं. यात प्रशिक्षक दिलीप पाटील यांच्यासह दीपमाला साळुंखे-बद्रे, पोलीस निरिक्षक अनिल कुरळकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश पाटील, पोलीस कर्मचारी राजेश कोचे, पोलीस निरिक्षक सतिश उमरे यांनी पदक पटकावलं आहे.

दक्षिण आफ्रिकेतील डर्बन आणि पीटर मरीडसबर्ग या दोन शहरांदरम्यान ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत ९० किलोमीटर अंतर पार करताना सहा टप्पे असतात.

ते सर्व टप्पे ठराविक वेळेत स्पर्धकांना पूर्ण करावे लागतात. ९० किलोमीटर अंतर बारा तासात पूर्ण करणाऱ्यांनाच पदक दिले जाते. ही जगातील सर्वात कठीण मॅरॅथॉन अमरावती इथले दिलीप पाटील यांनी २०२४सह तब्बल आठ वेळा पूर्ण केली आहे.

#####